**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**सायबर गुन्हे कक्ष**
३ रा मजला, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), यांचे कार्यालय,
ओत्सवाल हाईट्सचे समोर, कनाकिया रोड, मिरारोड पुर्व, ता.जि.ठाणे
फोन नंबर –०२२-२८११ ०१३५, व्हॉट्सॲप हेल्पलाईन क्र. ९०० ४८८ ०१३५
**Email ID – cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :-१७७/२०२२ दिनांक :- १०/०६/२०२२

## Bank Account Block असे सांगून लिंकद्वारे १,९९,९९९/- रुपयाची फसवणूक रक्कम परत मिळविण्यात सायबर गुन्हे कक्षास यश!!!

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत नालासोपारा पोलीस ठाणेचे हद्दीत राहणारे तक्रारदार श्री.आकाश मनोज गुप्ता, वय – २६ वर्षे यांचे मोबाईलवर तुमचे बँक खाते ब्लॉक झाले आहे अशा आशयाचा एसएमएस प्राप्त झाला होता. बँक खाते पुर्ववत करण्याकरीता लिंक दिलेली होती. त्यावर तक्रारदार यांनी माहिती भरली असता त्यांचे बँक खात्यावरुन १,९९,९९९/- रुपये रक्कम काढून घेतल्याबाबत सायबर गुन्हे शाखा आवक अर्ज क्रमांक ७४५-बी/२०२२ दिनांक ०६/०६/२०२२ अन्वये तक्रारी अर्ज सायबर गुन्हे कक्षाकडून चौकशी कामी प्राप्त झाला होता.

नमूद तक्रारीबाबत तात्काळ दखल घेवून तक्रारदार यांचे झाले व्यवहाराबाबत त्यांचे बँकेकडून माहिती प्राप्त करण्यात आली. प्राप्त माहितीचे अवलोकन केले असता तक्रारदार यांचे फसवणूक रक्कमेद्वारे आयसीआयसीआय बँकेचे क्रेडीट कार्डचे पेमेंट केले असल्याचे निर्दशनास आले. तात्काळ आयसीआयसीआय बँकेसोबत पत्रव्यवहार व पाठपूरावा करुन नमूद फसवणूक रक्कम थांबविण्यात आली. तसेच फसवणूक रक्कम पुन्हा तक्रारदार यांचे मुळ खात्यावर परत मिळविण्यात आली.

**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- **अशा प्रकारे फसव्या मेसेजद्वारे प्राप्त होणाऱ्या अनोळखी लिंकवर क्लिक करु नये.**
- **तसेच त्यामध्ये आपले बँक खाते तपशील, जन्मदिनांक वा इतर वैयक्तीक माहीती उघड करु नये.**
- **आपले मोबाईलवर प्राप्त होणारा ओटीपी कुणालाही देवू नये.**
- **कोणत्याही अनोळखी लिंक वर क्लिक करण्यापुर्वी त्याची विश्वासर्हता पडताळणी करुन घ्यावी.**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असे कृत्य कोणी करीत असल्याचे आढळुन आल्यास तात्काळ तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी डॉ.श्री.महेश पाटील,पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री.अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, सपोनि/स्वप्नील वाव्हळ, पोउपनिरी/प्रसाद शेनोळकर, पोलीस अंमलदार /१२०९५ इलग, पोलीस अंमलदार/१२०९५ प्रविण आव्हाड, महीला पोलीस अंमलदार/ १३१०४ पल्लवी निकम यांनी पार पाडली आहे.

सायबर गुन्हे शाखा संपर्क क्रमांक :- ०२२-२८११ ०१३५
सायबर गुन्हे शाखा व्हॉट्सॲप हेल्पलाईन क्रमांक :- ९०० ४८८ ०१३५
➢ सायबर गुन्हे शाखा ई-मेल आयडी :- **cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**

-----oooo----